स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:२७ सप्टेंबर, २०२२

-----------------------------------------------------------------------------------------------------------

जळगाव दि.२७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील हिवाळी २०२२ च्या विविध वर्गांच्या अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षा दिर्घोत्तरी पध्दतीने आयोजित करण्याचा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक झाली. त्यामध्ये सर्व अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षा दिर्घोत्तरी पध्दतीने घेण्याचा निर्णय झाला. कोविड १९ च्या प्रादूर्भावामुळे गेल्या दोन वर्षांपासून वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी पध्दतीने परीक्षा घेण्यात येत होत्या. आता कोविडचा प्रादूर्भाव कमी झाल्यामुळे पूर्वीप्रमाणे या परीक्षा होणार आहेत. त्या दृष्टीकोनातून विद्यापीठाने तयारी सुरु केली असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.दीपक दलाल यांनी दिली.

-----------------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी